ISSN

2017-18

Patil V.H

International Research Fellow Association's

March - 2018

E-ISSN: 2321-4953

IRFA's

# UNIRESEARCH

Multidisciplinary International E-Research Journal

Vol.- X    Issue - III

*Indexed in DRJI & Indian Citation Index* *Double Blind Peer Reviewed Journal*

UGC Approved List No. 63005    *Cosmos Impact Factor - 3.020 [2015]*

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all

Home  About Us  Organization  Commission  Universities  Colleges  Publications

UGC Approved List of Journals

You searched for: uniresearch

Total Journals : 1

Show 25 entries

Search:

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| [illegible] | 1 | 63005 | Uniresearch: Multidisciplinary International E-Research Journal | International Research Fellows Association | | 23214953 |

For Students    For Faculty    More

Chief Editor :

Dr. Dhanraj Dhangar,
Deptt. of Marathi,
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist. Nashik.[M.S.] India
Email: dhanrajdhangar@gmail.com
Mob. 7775982534

Swatidhan International Publications
For Details, visit us on: www.uniresearch.net.in

'Uniresearch'- International Multidisciplinary E-Research Journal | ISSN 2321-4953 (Online)
UGC Approved List No. 63005 *Impact Factor - 3.020*
Vol. 10 Issue. 3 | March - 2018


| | | | |
|---|---|---|---|
| 52 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद | डॉ. विक्रमराव पाटील | 249 |
| 53 | फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारेचा स्त्रीवादी विचारांवर पडलेला प्रभाव | प्रा.दिपाली पाटील | 252 |
| 54 | लोकशाही शासनात स्त्रियांचा सहभाग | प्रा. शालचंद मेश्राम | 256 |
| 55 | बाळजन्माशी संबंधित काम करणाऱ्या सुईण मांग स्त्रीचे समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. माधुरी चौधरी | 259 |
| 56 | ग्रामीण एकल महिलांच्या समस्या – एक अध्ययन | डॉ. मनोजकुमार भोवते | 263 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor-**

'Uniresearch'- International Multidisciplinary E-Research Journal | ISSN 2321-4953 (Online)
UGC Approved List No. 63005 Impact Factor - 3.020
Vol. 10 Issue. 3 | March - 2018

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद

डॉ. विक्रमराव नारायणराव पाटील
षंकरराव जगताप आर्ट्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज, वाघोली
संलग्न शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर

प्रस्तावना :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारत अखंड रहावा यासाठी विविध मार्गाने प्रयत्न केले आहेत. त्यांचे हे विचार सर्वसामान्य माणसापुढे मांडले जात नाहीत. आंबेडकरांनी केलेले राज्यघटना निर्मितीचे कार्य म्हणजे त्यांची नि:सीम देशभक्ती, देशसेवा आहे. ते भारत एकसंध , बलशाली होण्याचे स्वप्न पाहत होते. भारतीय राज्यघटनेतून समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय यांचा अंतर्भाव करुन त्यांनी सार्वभौम, लोकशाही , प्रजासत्तकाच्या पुरस्कार केला. भारतातील विविध धर्माचे पंथाचे जातीजमातीचे लोक आणि त्या सर्वांच्या वेगवेगळया रुढी, परंपरा, प्रथा या सर्वांना एकत्रितपणे आणण्याचे आणि त्यांच्यामध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या माध्यमातून केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विविध मार्गाने राष्ट्रवाद जोपसला आहे हे त्यांच्या पुढील विचारातून लक्षात येते. दुस–या गोलमेज परिषदेस जाताना मुंबई येथील जहागीर सभागृहात भरलेल्या सभेत बाबासाहेबांनी अत्यंत स्फूर्तीदायक भाषण केले. त्या भाषणात ते म्हणतात , 'तुम्हाला मी वचन देतो की, तुमचे कल्याण साधण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीन तुमचे माझ्यावरील प्रेम पाहून मला कोणतेही कार्य करण्याची उमेद वाटते. आपल्या स्वातंत्र्याच्या चळवळीला जेवढे यश मिळवता येईल तेवढे मिळवीन. व्यक्तीपेक्षा देश मोठा या भूमिकेतून बाबासाहेब एके ठिकाणी म्हणतात , ' जेव्हा देशाचे कल्याण आणि माझे स्वत:चे हित असा प्रश्न निर्माण होईल, तो माझ्या हितापेक्षा मी देशाच्या कल्याणाचा विचार करेन.'[१] यावरुन आंबेडकरांचा राष्ट्रवादाविषयी प्रखर व तेजस्वी विचार दिसून येतो.

भारतातील बहुसंख्य जनतेवर अन्याय करणारे फक्त इंग्रज लोक नाहीत तर भारतातीलच जहांगीरदार, सरंजामदार, भांडवलदार येथील जनतेची पिळवणूक करीत होते. त्यांच्यावर सरकारचे नियंत्रण असले पाहिजे. असा स्पष्ट विचार डॉ.बाबासाहेब मांडतात. अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात एम.ए. च्या पदवीसाठी जो प्रबंध सादर केला त्यामध्ये त्यांनी इंग्रज भारताची लूट कशाप्रकारे करत आहेत. या विषयी सविस्तर विवेचन केले आहे.

आंबेडकरांनी केवल भारतील स्वांतत्र्य चळवळीशी सहकार्य केले नाही या करिता त्यांना परधार्जिणेपणाचा दोषारोप करणे अन्यायकारक आहे. उलट परकीय राज्यकर्तावर आंबेडकरांनी कठोर टीका केली. ' राज्यकर्ते अनुसूचित जाती – जमातींना हक्क मिळवून देण्यासाठी उत्साहाने प्रयत्न करीत नाहीत या वर्गाना आपले किमान मानवी हक्क नाकारणा–यांच्या विरुध्द तो आपली सत्ता वापरीत नाहीत या परिस्थितीवर आंबेडकरांच्या मते एकच तोडगा होता आणि तो म्हणजे या जनतेला स्वातंत्र्य प्राप्त होणे'[२] डॉ. आंबेडकरांनी भारताच्या विकासाचा विचार नेहमी आपल्या लिखणातून व भाषणातून मांडला आहे. भारतातील शेतजमिनी संदर्भात त्यांनी 'भारतीय लहान – लहान शेतजमिनी व त्यावरील उपाय 'या लेखात त्यांनी शेतजमिनीचे लहान, तुकडे झाल्यामुळे भारतीय श्शेती तोटयाची झाली आहे यावर उपाय म्हणून जमिनीचे एकीकरण , विस्तारीकरणाचे स्वरुप मांडून त्यावरील लोकांचे असलेले अवलंबित्व दूर करण्यासाठी औद्योगिकरण मोठया प्रमाणात होणे गरजेचे आहे असा विचार आंबेडकरांनी मांडला.

भारतासारख्या देशाला कुटुंब नियोजनाची आवश्यकता आहे. असा सल्ला आंबेडकरांनी सर्वप्रथम दिला. परंतु त्यांच्या विचाराला हिंदू , मुस्लिम लिगच्या पुढा–यांनी प्रचंड विरोध केला. डॉ.बाबासाहेबांनी कुटुंब

नियोजनाचा विचार मान्य केला असता तर भारताचे जे आज प्रत्येक क्षेत्रात ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्या झाल्या नसत्या. स्वतंत्र भारताच्या पहिल्या लोकसभेत भाषण करताना ते म्हणाले होते, आपण वेगवेगळया प्रांतातील, धर्मातील लोक असलो तरी यापुढे प्रथम भारतीय आहोत याच अंगाने विचार विचार केला पाहिजे व देशाची अखंडता शाबूत राहिली पाहिजे. ' बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रवादी होते या आपल्या भिन्न मतपत्रिकेत त्यांनी भारतात वेगवेगळया प्रांतनिर्मितीला विरोध केला होता. भाषावर प्रांतरचनेचे तत्व एकदा स्वीकारले की त्यातून अनेक अडचणी निर्माण होतील, असे त्यांनी बजावले होते. या संदर्भात मांडलेल्या विचारावरुन त्यांनी राष्ट्रीयत्वाच्या भावनेला देशाच्या एकात्मतेच्या दृष्टीने किती महत्व दिले होते हे कळते. [३] भारतामध्ये स्त्रीयांवर मोठया मोठया प्रमाणात अन्याय, अत्याचार होतात याविषयी त्यांनी जे हिंदू कोड बिल मांडले होते त्यामध्ये स्त्रीयांना न्याय देण्याचा प्रयत्न केला होता. स्त्रीचे समाजातील महत्व सांगताना स्त्रीचे स्वातंत्र आणि प्रगती किती आवश्यक आहे याबद्दल ते म्हणतात , " स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरुन एखाद्या समाजाची प्रगती मी मोजीत असतो." [४] यावरुन असे म्हणता येईल की, समाजाची प्रगती व्हायची असेल तर स्त्रीयांची प्रगती झाली पाहिजे असा विचार त्यांनी मांडला.

भारतामध्ये ज्या विविध भाषा आहेत त्याबद्दल डॉ.आंबेडकरांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. सर्व भारतीयांना जर एकत्रित होऊन एक समान संस्कृती उभारावयाची असेल तर त्यांनी हिंदी ही आपली भाषा म्हणून अंगी करणे हे त्यांचे कर्तव्यकर्म आहे. भाषा ही संस्कृतीचे वाहन असते. समान भाषेतून समान संस्कृती साकार झाल्यास या देशातील सांस्कृतीक व वांशिक संघर्ष ही विलय पावू शकतील असा त्यांना विश्वास होता. राष्ट्रऐक्य व राष्ट्रवाद असा उभयताचा समान भाषा हा मुख्य आधार ठरु शकतो असे त्यांना वाटत होते. राष्ट्राचे, राजकीय व सामाजिक ऐक्य आंबेडकरांना अत्यंत मोलाचे वाटत होते. या राष्ट्राच्या सांस्कृतिक पूर्वसंचिताबद्दल व उज्वल भवितव्याबद्दल त्यांना नितांत आदर व ठाम विश्वास होता. वर्तमान सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थिती फारशी समाधानकारक नव्हती. हा समाज या सर्वच क्षेत्रात , गटात विभागला आहे तरीपण योग्य त्या काळानंतर व उचित प्रयत्नानंतर ही परिस्थिती बदलू शकेल अशी आंबेडकरांना खात्री होती.

सारांश :

वरील विश्लेषणाच्या अभ्यासाअंती असे म्हणता येईल की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रवाद विवेकी , वैज्ञानिक न्याय व समतेवर आधारित आहे. आज देशातील परंपरा तपासल्या पाहिजेत . कशाचा अभिमान बाळगला पाहिजे हे ठरविले पाहिजे. जात , वर्ग ,वर्ण लिंग, कर्मकांड, रुढी , परंपरा यांची चिकित्सा करुन विवेकवादी व्हावे तरच प्रत्येक भारतीयांच्या मनात या देशाच्या प्रती राष्ट्रीय भावना जागृत होईल. डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवादाचा उगम गरीब व दलित –अस्पृश्यतांबद्दल त्यांना असलेल्या जाणीवेतून दिसून येतो. समान संधी व मानवी हक्क अनेक शतकापासून नाकारले गेल्यामुळे मानवी अस्तित्वालाही पारखे झालेले हे वर्ग दास्यातून व दारिद्रयातून मुक्त झाल्याखेरीज राष्ट्र जीवनाशी समरस होऊ शकणार नहीत असा विचार आंबेडकरांचा होता. आबेंडकरांना अभिप्रेत असलेले राष्ट्रैक्य हे केवळ राजकीय ऐक्य नव्हते तर आत्मिक व सांस्कृतिक स्वरुपाचे ऐक्य त्यांना हवे होते. मनाच्या युतीतून आकारास येणारे सामाजिक ऐक्य हवे होते.

अशाप्रकारे डॉ. आंबेडकरांची उपेक्षित , स्त्रीया , अदिवासी , अल्पसंख्याक दलित या सर्वांना न्याय, स्वांतत्र्य व समता देण्यासाठी विविध प्रश्नांची सोडवणूक करुन राष्ट्रीय ऐक्य निर्माण केले आहे.

संदर्भ :

१. किरवले कृष्णा (संपा) – भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर, रौप्यमहोत्सवी जयंती गौरव ग्रंथ, प्रकाशक–शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, एप्रिल २०१६, पृ.९५

ISSN 2321-4953 (Online)
March - 2018

२. भोळे भा.ल. – आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापूरे अॅण्ड कं. पब्लिशर्स नागपूर पृ. ८२८
३. किरवले कृष्णा (संपा) – भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती गौरव ग्रंथ,प्रकाशक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, एप्रिल २०१६ पृ.१०८
४. उपरोक्त – पृ. क्र. ८९

संदर्भग्रंथ यादी

१. चौसाळकर अशोक (संपा) – समाज प्रबोधन पत्रिका, प्रकाशक , प्रा.विलास वाघ समाज प्रबोधन संस्था, पुणे ऑक्टोबर – डिसेंबर २०१६
२. भोळे भा.ल. – आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापूरे अॅण्ड कं. पब्लिशर्स नागपूर
३. किरवले कृष्णा (संपा) – भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती गौरव ग्रंथ, प्रकाशक , शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर,
४. सुरवडे विजय (संपा) –डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे, प्रकाशक , लोकवाङ्मय गृह ऑक्टोबर २००७, मुंबई
५. कसबे रावसाहेब – डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशक पुणे , जून २०१४